Letter - 1987

पुणे येथील मा· औदयोगिक न्यायालयात

तक्रार (युएलपी) नं·

श्री·
व्दारा हिंद मजदूर सभा,
५४, बुधवार पेठ, काकाकुवा मॅन्शन,
लक्ष्मी रोड, पुणे ४११००२· ------------------------ तक्रारदार

विरुध्द

१· मा· मुख्य वन संरक्षक,
महाराष्ट्र राज्य,
सेंट्रल बिल्डींग, पुणे ४११००१·

२· मा· वन संरक्षक,
पुणे वृत्त, पुणे·
पी·एम·टी· बिल्डींग
स्वारगेट, पुणे ४११०४२·

३· मा· विभागीय वन अधिकारी,
जुन्नर जि· पुणे· ------------------- सामनेवाले·

एम·आर·टी·यू आणि पीयुएलपी ॲक्ट १९७१ च्या अनुसूची ४ मधील बाब क्रमांक ५,६,९ व १० मध्ये नमूद केलेल्या अनुचित कामगार प्रथांचा वापर केल्याबाबत व करीत असल्याबाबत सेक्शन २८(१) प्रमाणे तक्रार अर्ज·

तक्रारदार खालील प्रमाणे निवेदन करीत आहे·

१· तक्रारदार हा वन खात्यातील कर्मचारी या नात्याने प्रस्तुतची तक्रार दाखल करीत आहे·

२· सामनेवाले हे वन विभागात काम करणा-या कर्मचा-याचे अधिकारपरत्वे एम्प्लॉयर असून त्याचे नियंत्राणाखाली व हुकूमतीखाली कर्मचा-यास काम करावे लागते· सामनेवाले यांनी कायदयाची अनूसूची ४ मधील क्र·५,६,९ व १० मध्ये नमूद केलेल्या अनुचित कामगार प्रथांचा वापर दिं· / /८७ पासून केला असून असा वापर करणे सामनेवालेयांनी सदर दिवसापासून सातत्याने व दररोज चालू ठेवला आहे· सदरच्या अनुचित कामगार प्रथांच्या कार्यवाही पासून परावृत्त व्हावे व तक्रारदारास न्याय मिळावा याबाबत तक्रारदाराचे संघटनेने म्हणजेच " पुणे जिल्हा बांधकाम वन व लाकूड कामगार सभा " यांनी वेळोवेळी महाराष्ट्र शासनाकडे व सामनेवाले याचेकडे अर्ज विनंत्या केल्या आहेत· संघटनेचे जनरल सेक्रेटरी यांनी दिं· / /८७ रोजी सविस्तर निवेदन पाठवून अन्याय दूर करण्या-विषयी विनंती केली आहे· परंतु अदयाप काहीही कार्यवाही करण्यात आली नाही·

३· सामनेवालेयांनी अनुचित कामगार प्रथांचा वापर केला व करीत असल्याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे·

पान २ ·······

अ ) सामनेवाले नं. १ हे महाराष्ट्र राज्याचे वन खात्याचे मुख्य कार्यालय असून सामनेवाले नं. २ हे पुणे वृत्ताचे मुख्य कार्यालय आहे. तर सामनेवाले नं. ३ हे वन खात्याचे जुन्नर विभागाचे कार्यालय आहे. सामनेवाले याचेकडून वनसंवर्धन, वनसंरक्षण, वन विकास आदी वन, जंगल, नर्स-याचे बाबत कामकाज चालते. जंगल वाढविणे , रक्षण करणे, निगा राखणे, नवीन झाडे लावणे, नर्स-या तयार करणे, रोपे तयार करणे, जाळपटट्या काढणे, जमिनीची मशागत करणे, झाडांची निगा , देखभाल करणे व अधिकारी सांगतील ती सर्व कामे कामगारांना करावी लागतात. ही सर्व कामे बारमाही स्वरुपाची आहेत. सामनेवाले नं. ३ हे सामनेवाले नं. १ व २ याचे विभागीय वन अधिकारी असून त्याचे नियंत्रणाखाली कामगारांना काम करावे लागते.

ब ) तक्रारदार हा सामनेवाले यांच्या जुन्नर विभागातील --------रेंज मध्ये वॉचमन/ पहारेकरी या हुदयावर काम करीत आहे. त्यास दररोज रुपये या दराने पगार मिळतो. त्याची सदर वन विभागात वर्षाहून अधिककाळ नोकरी झालेली आहे. तक्रारदार करतो ते काम कायम स्वरुपी आहे. परंतु तक्रारदारयांस कायमपणाचे फायदे , सवलती, प्राप्त होऊ नयेत म्हणून त्यास कायम करण्यात आलेले नाही. त्यास रोजंदारी कामगार समजले जात आहे. सामनेवालेयाचेकडील रोजंदारीवरील कामगारांची सेवाजेष्ठता यादी ठेवली जाते. या यादीतील जेष्ठता क्रमानुसार कर्मचा-यांना कायम कर्मचारी समजून कायम करणे आवश्यक आहे. परंतु तक्रारदारास वर्षानुवर्षे तात्पुरता कर्मचारी म्हणून सामनेवालेयांनी नोकरीत चालू ठेवलेले आहे. त्यामुळे त्याला रजा,पगारवाढ वा त्या अनुषांगाने मिळणा-या सर्व सोयी सवलती पासून वंचीत करण्यात आलेले आहे. सामनेवाले हे तक्रारदारास केव्हाही काम नाकारुन त्याचे नोकरीचे कालावधीत कृत्रीम खंड पाडण्याचा प्रयत्न करीत आहेत.

क ) तक्रारदार करीत असलेले काम हे कायम स्वरुपी असून त्याची वर्षाहून अधिककाळ सलग नोकरी झालेली असूनही त्यास कायम करण्यात आलेले नाही. साप्ताहिक सुटटी , हक्काची सवलत ही त्याला नाकारण्यात आली असून सुटटी न देता त्याचेकडून काम करवून घेतले गेले आहे. सामनेवाले नं. १ व सामनेवाले नं. २ यांच्या अधिपत्याखाली पुणे विभागात मात्र रोजंदारीवरील कामगारांना साप्ताहिक सुटटी देण्यात येत असून साप्ताहिक सुटटीचा पगारही दिला जातो. अशारीतीने कामगारा कामगारांमध्ये भेदभाव करुन अनुचित कामगार प्रथांचा वापर केला व करीत आहेत.

ड ) शासकीय अधिसूचना उदयोग, उर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए ५२८५/६१३३ का ७ दिं. १५ मे १९८६ व्दारे वन व वनशास्त्र उदयोगातील कामगाराचे किमान वेतन शासनाने निश्चीत केले आहे. परंतु सदरचे किमान वेतन देण्याबाबत दिरंगाईचे व टाळाटाळीचे धोरण अवलंबून शासकीय आदेशाचा भंग करीत आहेत.

पान ३...

ई ) तक्रारदारास सामनेवाले महाराष्ट्र शासनातील इतर कर्मचा-यास लागू असलेल्या रजा, महागाई भत्ता, वैद्यकिय भत्ता, सोयी सवलती, व इतर अन्य सवलती नाकारुन भेदभावाची वर्तणुक करुन घटनात्मक मूलभूत हक्काची पायमल्ली करुन असमान पध्दतीची अन्यायकारक वर्तणूक देत आहेत. सदरची कार्यवाही अनफेअर लेबर प्रॅक्टीसचे कलम ५,६,९ व १० प्रमाणे अनुचीत कामगार प्रथा आहे. सदरच्या कार्यवाही पासून तक्रारदारास फार मोठे आर्थिक नुकसान झाले व होत असून त्याचेवर झालेला व होत असलेला अन्याय दूर करुन घेण्यासाठी सदरचा अर्ज तक्रारदारास करणे भाग पडत आहे.

फ ( अशा रीतीने सामनेवाले यांनी या तक्रारअर्जाचे परिच्छेद क्र. २ मध्ये नमूद केलेल्या अनुचित कामगार प्रथांचा वापर केला असून तो सातत्याने चालू ठेवलेला आहे.

४. तक्रारदाराने प्रस्तुतची तक्रार इतर कोणत्याही न्यायालयात दाखल केलेली नाही. अगर इतर कोणत्याही प्राधिका-यापुढे अनिर्णीत नाही.

५. कुणीही मा. चौकशी अधिकारी यांनी प्रस्तुत तक्रारीची चौकशी केलेली नाही. ही तक्रार मुदतीत म्हणजे ९० दिवसाचे आत दाखल केली आहे. सामनेवालेयांनी अनुचित कामगार प्रथांचा वापर चालू ठेवला असल्याने सदर तक्रार दाखल करण्यास मुदतीची आवश्यकता नाही.

६. तक्रारदार खालील कागदपत्रांचा आधार प्रस्तुत तक्रार प्रकरणी पुराव्याचे कामी घेवू इच्छितो.

१. सामनेवाले याचे नोकरी विषयक नियम.

२. सामनेवाले याचे सन १९७९ ते १९८६-८७ या काळातील हजेरी पुस्तके, पगार पत्रके व लीव्ह वुईथ वेजेस रजिस्टर्स.

३. या विभागातील रोजंदारी अस्थापनेवर काम करणा-या कामगारांची जाहीर केलेली खाते निहाय व एकत्रीत अधिकृत सेवाजेष्ठता यादी.

४) कामाला लागलेल्या दिवसापासूनच्या तक्रारदाराचे हजर दिवसांचा तक्ता.

७. तक्रारदार खालील साक्षीदारांची साक्ष नोंदवू इच्छितो.

अ ) तक्रारदार स्वत:

ब ) तक्रारदार याच्या नोंदणीकृत संघटनेचा पदाधिकारी.

क ) सामनेवाले याच्या रोजंदारी अस्थापनेवर असलेला संबंधीत कर्मचारी.

८. प्रस्तुत तक्रार प्रकरणी अनुचित कामगार प्रथांचा वापर थांबीवणेसाठी सामनेवाले याचेशी तक्रारदार याने व त्याचे कामगार संघटनेने संपर्क साधला होता. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही.

९· प्रस्तुतचा तक्रारदार मा· न्यायालयास अत्यंत नम्रपणे अशी प्रार्थना करतो की, या तक्रारीची संपूर्ण चौकशी करण्यात यावी आणि सामनेवालेयांना अनुचित कामगार प्रथा बंद करणे बाबत आदेश देण्यात यावा व खालील प्रमाणे रिलीफ मंजूर करण्यात यावेत·

अ ) या तक्रार अर्जाचे परिच्छेद क्र· २ मध्ये नमूद केलेल्या अनुचित कामगार प्रथांचा सामनेवाले यांनी वापर केला असल्याचे व सातत्याने चालू ठेवला असल्याचे जाहीर करण्यात यावे·

ब ) तक्रारदार याचे नोकरीत लागल्यापासून ज्या दिवशी २४० दिवस पूर्ण झाले त्या दिवसापासून त्यास कायम कर्मचा-याचा हुद्दा , वेतनश्रेणी व इतर आर्थिक लाभ देण्यावा व त्यास नोकरीत कायम कामगाराचा दर्जा देण्याचा हुकूम सामनेवाले यांना देण्यात यावा· व त्याप्रमाणे वेतनाचा फरक देण्याबाबत आदेश व्हावेत· तसेच साप्ताहिक सुटटीचा आर्थिक लाभ देणे बाबत हुकुम व्हावा·

क ) प्रस्तुत तक्रार प्रकरणी तक्रारदार याचा झालेला खर्च सामनेवाले याचेकडून नुकसान भारपाईसह देववावा·

ड ) इतरही योग्य न्याय्याचे हुकुम व्हावेत·

१०· प्रस्तुत तक्रार ही आज दिनांक रोजी पुणे येथे दाखल केली आहे·

पुणे

दिनांक -१९८७

तक्रारदार

## प्रा मा ण्य ले ख

मी, श्री

राहणार ता· जि· पुणे सत्य प्रतिज्ञेवर जाहीर करतो की वरील तक्रार अर्जाचे परिच्छेद क्रमांक १ ते १० यात नमूद केलेला मजकूर हा माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर असून या प्रामाण्यलेखावर मी आज दिनांक - - ८७ रोजी पुणे येथे सही केली असे·

तक्रारदार·

- मा ग ण्या -

१. कायमपणा :- वन खात्यात आज हजारो कामगार रोजंदारीवर वर्षानुवर्षे काम करत आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारच्या सोयी सवलती दिल्या जात नाहीत. ५ वर्षापासून २२ वर्षापर्यंत सातत्याने काम करणारे हजारो कामगार आज वनखात्यात आहेत. तरी ज्या कामगाराचे वर्षात २४० दिवस भरले आहेत, त्या कामगारांना त्या दिवसापासून कायम करण्यात यावे व त्या दिवसापासून सर्व शासकीय सोयी सवलती लाभ व फरक त्वरीत देण्यात यावा.

२. साप्ताहिक सुट्टी :- वन कामगारांना कोणत्याही प्रकारची सुट्टी दिली जात नाही. बहुसंख्य कामगारांना तर रवीवारची साप्ताहिक सुट्टी ही दिली जात नाही. पर्वती पावगाव, बनेश्वर, थेऊर, भांबुर्डा या पुणे विभागातील फक्त कामगारांना भरपगारी सुट्टी देण्यात येते. तरी सर्व कामगारांना सहा दिवस पूर्ण काम केल्यानंतर साप्ताहिक भरपगारी सुट्टी त्वरीत देण्यात यावी. व बुडालेल्या सर्व सुट्यांचा पगारही त्वरीत देण्यात यावा. तसेच सर्व राष्ट्रीय सुट्टयाही देण्यात याव्यात.

३. किमान वेतन :- महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई ३२, यांच्या १५ मे ८६ च्या शासकीय अधिसूचने प्रमाणे सर्व वन कामगारांना मागील फरकासह वेतन देण्यात यावे. याबाबत संघटनेचे अध्यक्ष मा. बा. न. राजहंस यांनी संबंधीत अनेक वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटी घेवून सविस्तर चर्चा करुन किमान वेतनाची अंमबजावणीचा आग्रह धरला. परंतु किमान वेतनाची अंमलबजावणी झाली नाही. १५ मे ८६ ची शासकीय अधिसूचना वनखात्याचे वरीष्ठ अधिकारी निष्कारण टाळाटाळीचे धोरण अवलंबून अंमलात आणीत नाहीत. ही खेदाची गोष्ट आहे. मा. कामगार आयुक्त मुंबई यांच्या जा.क्र.काआ/किवेअ/वन व वनशास्त्र/ मु.का. ८ दि. १० नोव्हेंबर ८६ च्या पत्रावरुन ही अधिसूचना वन खात्यात लागू असल्याचे स्पष्ट आहे. तरी सर्व वन कामगारांना या अधिसूचने प्रमाणे १५ मे १९८६ पासूनचा फरक देवून किमान वेतन लागू करावे.

४. सेवाजेष्ठता यादी :- वन खात्यातील कामगारांची सेवाजेष्ठता यादी तयार करण्यात येवून त्याची प्रत संघटनेस देण्यात यावी. दिनांक २८-४-८६ रोजी मा. मुख्य वनसंरक्षक महाराष्ट्र राज्य, पुणे याचे कार्यालयात झालेल्या चर्चेचे वेळी ही गोष्ट मान्य करण्यात आली होती. परंतु अदयापही सेवाजेष्ठता यादी तयार झालेली नाही.

पान २........

५·कामाची शाश्वती :- रोजंदारी वरील वन कामगार हेच वन विकासात अत्यंत महत्वाच्या वाटा सांभाळणारे आहेत· ५ ते २२ वर्षे सातत्याने काम करुनही कोणतीही नोकरीची शाश्वती नाही· पुणे संशोधन विभागात श्री· बाळा भुमकर सारखे सातत्याने १८ वर्षे काम करणारे ,सिताराम धर्माजी सैद (रा· महाळुंगे पडवळ ) या सारखे नारायणगाव रेंजमध्ये सुमारे १६-३-६६ पासून सातत्याने काम करणारे तर कोंडाजी नथु होर्डे (रा· गिरणारे नाशिक) यासारखे रात्रंदिवस गंगापूर नर्सरीत २३ वर्षे काम करणारे हजारो मजूर वन खात्यात काम करीत आहेत· परंतु त्यांना नोकरीची शाश्वती नाही· त्याचे कोणतेही काम अथवा कामाचे तास अथवा पाळ्या ठरलेल्या नाहीत· अधिका-यांच्या मर्जीनुसार काम करावे लागते· केव्हाही कमी केले जाते· तेव्हा वन खात्यातील २४० दिवस पूर्ण झालेल्या कोणत्याही मजूरास कामावरुन कमी करण्यात येवू नये·

६·वनरक्षक व माळी :- या पदासाठी रोजंदारी वरील वर्षानुवर्षे काम केलेल्या अनुभवी पात्र मजूरांमधूनच निवड करण्यात यावी· तसे आदेश सर्व संबंधितांना ,अधिका-यांना दयावेत·

७·इतर सवलती :- वन विभागात काम करणा-या हजारो वॉचमन चौकीदार, पहारेकरी यांना कोणताही गणवेश अथवा ओळखपत्र नाही· वन विभागात झाडांची होणारी चोरटी तूट बेकायदेशीरपणे चाललेले व्यवहार पाहता वनाचे रक्षण करणा-या हजारो वॉचमन पहारेकरी चौकीदार यांना गणवेश ओळखपत्र व पुरेसे अधिकार देण्याची आवश्यकता आहे· तसेच सर्व वॉचमन ,चौकीदार यांना काठी,घोंगडया, बॅट-या आदी अत्यावश्यक वस्तु गणवेश व ओळखपत्रासह देण्यात यावी· सहकार्याचे अपेक्षीत·

वरील मागण्यांबाबत तातडीने विचार करुन वन कामगारांना न्याय मिळवून दयावा ही विनंती·

आपले ,

( प्रकाश भिंदे ) ( बा·न·राजहंस )
जनरल सेक्रेटरी अध्यक्ष